| | |
|---|---|
| | **नि.दि.मु.नं. १०४/२०२५**<br>**संभाजी पाटील वगैरे विरुध्द श्री. भाऊ पाटील वगैरे**<br>**CNR No.MHSN14-000550-2025** |

## नि.क्र. १४ वरील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं. १ व २ यांचेविरुध्द मनाई आदेश मिळविण्याकरिता दाखल केलेला आहे.

**वादी यांचे थोडक्यात कथन असे की,**

२. वादींनी प्रस्तुतचा दावा मौजे औढी, ता. शिराळा, जि. सांगली येथील एकूण ३१ जमीन मिळकतीबाबत प्रतिवादी यांचेविरुध्द वाटप व निरंतरचे मनाईकरीता दाखल केलेला आहे. दाव्याचे कामी प्रतिवादी नं. १ व २ यांना दाव्याच्या व ताकीद अर्जाच्या नोटीसा मिळालेल्या आहेत. परंतु सदर प्रतिवादी यांनी अद्यापही वादींच्या दाव्यास कैफियत अगर म्हणणे दाखल केलेले नाही. या कारणामुळे प्रतिवादी नं. १ व २ यांचेविरुध्द मे.कोर्टानी एकतर्फा आदेश केलेला आहे. परंतु दावा मिळकतीपैकी अ.नं. ६ येथील गट नं. ६७० व अ.नं. ७ येथील गट नं. ६७१ या मिळकती वादी व प्रतिवादी यांचे हिश्याच्या गवतपड मिळकती आहेत. सदर मिळकतीमधील गवत सध्या काढणेस आलेले आहे. परंतु, प्रतिवादी नं. १ व २ हे दांडगाव्याने व बेकायदेशीररित्या वर नमूद केलेल्या गट नं. ६७० व ६७१ या मिळकतीमधील वादी यांच्या हिश्याचे गवत काढणेस हरकत, अडथळा करुन प्रतिबंध करु लागलेले आहेत. तसेच प्रतिवादी नं. १ व २ हे दांडगाव्याने व बेकायदेशीररित्या गट नं. ६७० व ६७१ या मिळकतीमधील वादी यांच्या हिश्याचे गवत देखील कापणी करुन त्याची विक्री करण्याचे प्रयत्न करु लागलेले आहेत.

वस्तुतः वादींनी प्रतिवादी नं. १ व २ यांना वरीलप्रमाणे कृत्य न करणेस सांगितले असता प्रतिवादी नं. १ व २ हे वादींचे ऐकण्याच्या मनस्थितीत नसून वादींनी त्याबाबत शिराळा पोलीस स्टेशन येथे रितसर तक्रार देण्याचा प्रयत्न केला असता वादींना त्याबाबत दिवाणी कोर्टाचा आदेश आणणेबाबत सांगणेत आले आहे.

**३.** प्रतिवादी नं. १ व २ हे कायदा न जुमानणारे इसम असून ते वर नमूद केलेल्या गट नं. ६७० व ६७१ या मिळकतीमधील वादींच्या हिश्याचे गवत काढणेस वारंवार दांडगाव्याने व बेकायदेशीररित्या प्रतिबंध करुन हरकत व अडथळा करु लागलेले असून वादींच्या हिश्याचे वरील मिळकतीमधील गवत दांडगाव्याने स्वतः काढून ते परस्पर विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. तसे झाल्यास वादी यांचेवरती अन्याय होणार असून दाव्याचे कामी देखील तांत्रीक अडचण निर्माण होणार आहेत. प्रतिवादी नं. १ व २ यांच्या सदर कृत्यास मे.कोर्टामार्फत वेळीच अटकाव करणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. सबब, वर कथन केलेल्या संपूर्ण कायदेशीर कारणांकरीता प्रतिवादी नं. १ व २ यांनी दावा मिळकतींपैकी गट नं. ६७० व ६७१ या मिळकतींमधील वादींच्या हिश्याचे गवत काढणेस अडवणूक अगर प्रतिबंध करुन हरकत व अडथळा करु नये तसेच वादींच्या हिश्याचे वरील मिळकतींमधील गवत दांडगाव्याने स्वतः काढू नये व ते परस्पर विक्री करु नये असा प्रतिवादी नं. १ व २ यांचेविरुध्द ताकीदीचा आदेश करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**४.** प्रतिवादी नं. १ व २ यांना दाव्याचे समन्स मिळून देखील ते गैरहजर राहिल्यामुळे त्यांच्याविरुध्द दावा एकतर्फा चालविण्याबाबतचा आदेश दि.

१९/०९/२०२५ रोजी करण्यात आला. प्रस्तुत अर्जाची नोटीस नि.क्र. १५ प्रतिवादी नं. १ व २ यांना मिळून देखील ते हजर झाले नाहीत त्यामुळे प्रस्तुत अर्ज देखील त्यांचेविरुध्द एकतर्फा चालविण्याचा आदेश दि. २३/१२/२०२५ रोजी करण्यात आला.

**५.** वादींतर्फे विधीज्ञ श्री.एच. एस. सुरले यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचे कथनांनुसार युक्तीवाद केला. वादींची कथने, कागदपत्रे व युक्तीवादावरुन माझ्यापुढे खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| **अ.नं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | वादींनी सकृत दर्शनी केस सिध्द केली आहे का ? | **नकारार्थी** |
| **२.** | दाव्याचा कल वादींच्या बाजूने आहे का ? | **नकारार्थी** |
| **३.** | वादींच्या हक्कात तुर्तातुर्त मनाई हुकूम न दिल्यास वादींचे अपरिमित असे नुकसान होईल का ? | **नकारार्थी** |
| **४.** | कोणता आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**६.** वादी यांनी अर्जाचे कथनापृष्टयर्थ कागदयादी नि.क्र. ३ सोबत दावा मिळकतींचे ७/१२ उतारे तसेच ग्रामपंचायत उतारे, फेरफार दाखल केले आहेत.

## कारणमिमांसा

**मुद्दा नं. १ ते ३ करीता :-**

**७.** दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ प्रमाणे कोणत्या परिस्थीतीत तुर्तातुर्त ताकिद देता येईल याबाबत स्पष्टीकरण दिलेले आहे. न्यायालयाच्या समोर एखाद्या दाव्यामध्ये शपथेवर एखादे कथन सिध्द करुन अथवा

अन्य मार्गाने जर दावा मिळकत ही नुकसान, नाश अथवा हस्तांतरित करण्याच्या विचारात दाव्यातील संबंधित पक्षकार असतील अथवा संबंधित मिळकत ही बेकायदेशीररित्या एखाद्या दरखास्तीच्या मागणीमध्ये विक्री होत असेल, प्रतिवादी हे दावा मिळकत त्या जागेवरुन हालवायचा प्रयत्न करत असतील अथवा नाश करण्याचा प्रयत्न करत असतील, प्रतिवादी हे वादीला दावा मिळकतीतून बेदखल करण्याचा प्रयत्न करत असतील किंवा त्या अनुषंगाने वादीला नुकसान होईल असे कृत्य करत असतील तर न्यायालयाला सदरचे कृत्य थांबवण्याच्या उद्देशाने तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत करण्याचे ऐच्छीक अधिकार दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दिलेले आहेत. परंतु सदरचे अधिकार वापरताना न्यायालयाने वादी व प्रतिवादी यांची कथने व पुरावा याचा विचार करुन वस्तुस्थिती संदर्भात न्याय देण्यासाठी ऐच्छीक अधिकाराचा वापर करणे आवश्यक आहे. वादी व प्रतिवादी यांनी तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज मंजूर होण्यापुर्वी प्रथमदर्शनी केस, न्यायाचा समतोल व कधीही भरुन न येणारे नुकसान या बाबी सिध्द करणे आवश्यक आहे.

८. वादींचे कथनांनुसार दावा मिळकती या वादी, प्रतिवादींच्या वडिलोपार्जित मिळकती असून दावा मिळकतींचे सरस–निरस मानाने वाटप झालेले नाही. दावा मिळकतींपैकी गट नं. ६७० व गट नं. ६७१ या गवतपड मिळकतीमधील वादींच्या हिश्याचे गवत काढणेस प्रतिवादी नं. १ व २ हरकत, अडथळा करुन वादींच्या हिश्याचे गवत कापून विक्री करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

९. प्रतिवादींतर्फे प्रकरणात हजर होऊन कैफियत व म्हणणे दिलेले नाही. वादींतर्फे त्यांचे कथनांपृष्ठ्यर्थ दाखल केलेले दावा मिळकतींचे उतारे पाहता सदर मिळकती वादी, प्रतिवादींचे वडिलोपार्जित असल्याचे तसेच गट नं. ६७० व ६७१ मध्ये वादी, प्रतिवादींची नांवे समाईकात मिळून असल्याचे दिसते. वादींचेच कथनांनुसार प्रस्तुतचा दावा त्यांनी वाटपासाठी दाखल केला असल्यामुळे मिळकतींचे सरस–निरस मानाने वाटप झालेले नाही. त्यामुळे प्रतिवादी हे मिळकतींमध्ये सहहिस्सेदार आहेत. गट नं. ६७० व गट नं. ६७१ मध्ये वादींचा

हिस्सा ठरलेला नाही. सदर मिळकतींमध्ये वादी, प्रतिवादींचा समान हक्क आहे. अशा परिस्थितीत सदर मिळकतींचे सरस–निरस मानाने वाटप झाले नसल्याने व वादी, प्रतिवादींचा हिस्सा ठरलेला नसल्यामुळे वादींना प्रथमदर्शनी केस नाही. न्यायाचा तराजू  हा वादींचे बाजुने नाही. त्यामुळे वादी हे प्रतिवादींविरुध्द अर्जात मागणी केल्याप्रमाणे ताकीद मिळणेस पात्र नाहीत. करीता मुद्दा क्र. १ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वादींचा अर्ज नि.क्र. १४ नामंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात येतो.

DESAI VINAYA ATMARAM
Digitally signed by DESAI VINAYA ATMARAM
Date: 2026.03.24 18:03:13 +0530

शिराळा (व्ही. ए. देसाई)
दिनांक २४/०३/२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M. S. Gondkar (Steno. Grade-3) |
| Court | : | C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 24/03/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 24/03/2026 |
| Order uploaded on | : | 25/03/2026 |